REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 3 | DECEMBER - 2021

# पेशवाईच्या राज्यकारभारात त्रिंबकराव पेठे यांचे योगदान

डॉ. स्वाती घाटुळे
अे.आर.बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर.



भारताच्या इतिहासात अठरावे शतक हे मराठ्यांच्या इतिहासाचे शतक म्हणून ओळखले जाते. छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे रूपांतर पुढे साम्राज्यात झाले. स्वराज्य ते साम्राज्य या प्रवासात अनेक लढाया झाल्या, अनेकांना प्राणार्पण करावे लागले. स्वराज्य हे शूरवीरांच्या पराक्रमाची गाथा सांगणारे राज्य आहे. कोणतेही कल्याणकारी राज्य निर्माण करावयाचे असेल तर एकटा राजा कधीच काही करू शकत नाही. त्यासाठी सहाय्यक माणसाची जोड घ्यावी लागते, मग ते सहाय्यक मंत्री असतील, सरदार असतील प्रधान असतील. शिवरायांचा युद्ध कौशल्याचा वारसा घेऊन लढणा–या सरदारांमुळे पेशवेकाळात स्वराज्य विस्तारले. छ.शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्य कार्यात, स्वातंत्र्य लढ्यात व पुढे पेशव्यांच्या साम्राज्य विस्तारात अनेक पराक्रमी व्यक्तींची मदत झाली. सन 1713–1818 हा मराठा इतिहासातील पेशवाईचा कालखंड मानला जातो. याच काळात शिंदे, होळकर, भोसले, पवार, गायकवाड पुरंदरे, पेठे, रास्ते, पटवर्धन, विंचुरकर अशी महत्त्वाची व राजकारणात प्राबल्य राखून असलेली अनेक घराणी उदयास आली. या सर्वांचे पेशवाईतील योगदान महत्त्वपूर्ण आहे. प्रस्तुत शोधनिबंधात पेशवाईतील राज्यकारभारात त्रिंबकराव पेठे यांच्या कार्याचे योगदान कसे महत्वपूर्ण आहे याची माहिती घेणार आहोत.

पेठे दप्तरामधील पेठे घराण्याच्या वंशावळीनुसार हे घराणे मूळचे कोकणचे. विसाजी कृष्ण पेठे मोकदम कसबा गुहागर अशी पेठे दप्तरामध्ये नोंद आहे. विसाजी कृष्ण 1718 मध्ये नागपूरकर भोसल्यांच्या सैन्यात हरकारा म्हणून दिल्ली मोहिमेत सामील झाले होते. विसाजी कृष्णास त्रिंबकराव व माधवराव हे दोन पुत्र आणि रखमाबाई नावाची कन्या होती.रखमाबाई चा विवाह चिमाजीअप्पाशी झाला होता. तर पेशवे बाळाजी विश्वनाथची मुलगी अनुबाई ही इचलकरंजीच्या व्यंकटराव घोरपडे यांची पत्नी होती. अनुबाईची मुलगी वेणूबाई हिचा विवाह त्रिंबकराव पेठे यांचेशी सन 1724 मध्ये झाला होता. वेणुबाईचे सासरचे नाव येसूबाई होते. (चितळे वि.सी. (संपा.), पेठे दप्तर, भाग–२, पृष्ठ 83.). कौटुंबिक व राजकीय अशा दुहेरी नातेंबंधांची वीण पेठे व पेशवे घराणे यांच्यामध्ये होती. विसाजी कृष्ण पेठे यांचे पासून त्रिंबकराव पेठे यांचे पर्यंत पेठे घराण्यातील पाच पिढ्या पेशव्याच्या दरबारी कार्यरत होत्या. पेशवाईची, मराठी राज्याची निष्ठेने सेवा केली. पेशव्यानी त्रिंबकरावावर टाकलेल्या प्रत्येक पदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केली.

## त्रिंबकराव पेठे यांची राजकीय कारकीर्दीची सुरुवात.

त्रिंबकराव पेठे हे 22 ऑक्टोबर 1728 रोजी चिमाजी आप्पाचा कारभारी गोविंद कृष्ण यांच्या हाताखली कारकून म्हणून रुजू झाले. वडील विसाजी कृष्ण यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जागी खानदेश प्रांतात कमाविसदार म्हणून 1730 मध्ये नेमणूक झाली. (पेशवे दप्तर, खंड–30, लेखांक 316) वसुलीची कामगिरी त्यांनी उत्कृष्ठरित्या

पार पाडल्यामुळे पेशव्यांनी त्रिंबकरावांना पालखीचा मान दिला. हा मान थोड्याच कमावीसदारांना मिळत असे. खानदेशातील कर वसुलीची स्थिती त्यांनी अतिशय व्यवस्थितपणे हाताळल्यामुळे पेशव्यांनी त्यांना पुढे बागलानचा सुभेदार म्हणून वस्त्रे दिली. त्र्यंबकरावांनी खानदेश, बागलान वर महसूल वसुलीची चोख व्यवस्था करून शांतता सुव्यवस्था स्थापन केली. खानदेशात त्रिंबकरावांनी मराठ्यांच्या साम्राज्यविस्तार निर्मितीचा पाया भक्कम केला. पेशव्यांना त्रास देणा–या रघूजी भोसलेच्या विरोधात व–हाड प्रांताला त्यांनी चांगलाच उपद्रव दिला. याबद्दल त्यांना एक वर्षाची कैद ही भोगावी लागली. परंतु कैदेतून सुटका झाल्यानंतर त्यांना पाटणची सुभेदारी व चौथाई वसुलीचा अधिकार दिला.

## त्रिंबकराव पेठे व नानासाहेब पेशवे संबंध

पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांच्या कारकिर्दीत 28 मार्च 1753 रोजी त्रिंबकराव पेठे पुण्याचे दिवान असताना पेशव्यांच्या प्रशासनाची बाजू यशस्वीरीत्या सांभाळली. 1753–54 पेषवे कर्नाटक मोहिमेवर जाताना पुण्यात जनतेसाठी काही आचारधर्म पाळावेत म्हणून ब्राह्मणांसाठी दारूबंदीचे फर्मान काढले होते. परंतु पेशव्यांच्या गैरहजरीत पुण्यातील काही ब्राह्मणांनी चोरून दारूचे सेवन केले ही गोष्ट त्रिंबकरावाच्या लक्षात येताच त्यांनी निर्बंध तोडणा–या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना शिक्षा दिल्या. 1754 मध्ये पेशवे कर्नाटक मोहिमेवरून आल्यानंतर दारूचे उत्पादन बंद करावे असा आदेश काढला. परंतु त्यामुळे त्याच भागात राहणारे गरीब कष्टाळू लोक उपजीविकेचे साधन म्हणून दारू काढण्याचा धंदा करीत होते. हा धंदा बंद झाल्यामुळे हया लोकांकडून मिळणारा सरकारी महसूल बंद झाला व त्यांच्या चरितार्थाचा प्रश्न निर्माण झाला या सर्व गोष्टीचा विचार करून त्या भागातील दारूबंदीचा कायदा त्रिंबकरावांनी पेशव्यांना समजावून मागे घेतला. परंतु नारळ व सिंधीच्या झाडापासून फक्त दारू काढायची अट घातली. मात्र दारू विक्री व सेवन सरकारी कर्मचारी, ब्राह्मण व प्रभू या लोकांनी करायची नाही व जे या नियमांचे उल्लंघन करेल त्याला शिक्षा करण्यात येईल असे फर्मान काढले. ही योजना प्रभावीरित्या राबविण्यासाठी स्वतः त्र्यंबकरावांनी पुढाकार घेतला. त्यांच्या कार्यामुळे गोपिकाबाई यांनी त्रिंबकरावांचे कौतुक केले. (पुरंदरे कृ.वा. (संपा.) पुरंदरे दप्तर, भाग–२) पेशव्यांच्या गैरहजेरीत त्र्यंबकरावांनी पुण्याचे प्रशासन सक्षमपणे सांभाळला. पुण्यावर योग्य नियंत्रण ठेवले. याचीच पोचपावती म्हणून 4 जून 1754 रोजी कर्नाटक स्वारी वरून पेशवे पुण्यास आल्यावर 10 जुलै 1754 रोजी मोहाडीच्या मोकासाची सनद पेशव्यांनी त्रिंबकरावांना दिली. पेशवे निजाम विरोधी कारस्थानात गुंतले असताना पुण्याची जबाबदारी सांभाळून आर्थिक दृष्टी चौथाई वसूल करून अर्थव्यवस्था मजबूत केली. यावर खुश होऊन पेशव्यांनी त्रिंबकमामांना 20 मे 1754 रोजी जुन्नर येथे एक चाहुर जमिनीची सनद दिली. (चितळे वि.सी. (संपा.) पेठे दप्तर, भाग–२, पृष्ठ 90) दामाजी गायकवाड व सेनापती दाभाडे यांचे नामोहरण करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पेशवे बाळाजी बाजीरावाने कर्नाटक मध्ये अनेक मोहिमा काढून चौथाई व सरदेशमुखी लावली होती. ती वसुलीसाठी दरवर्षी आपल्या सैन्याला पाठवणे क्रमप्राप्त होते. डिसेंबर 1757 मध्ये मैसूर कडील खंडणीची थकबाकी वसूल करण्यास गोपाळराव पटवर्धन व त्रिंबकराव पेठे यांना रवाना केले. त्यांनी मैसूरवर आक्रमण करून थकबाकी मागितली व बेंगलोर, कोलार, होस्पेट इत्यादी प्रदेशावर हल्ले करून खंडणी वसूल केली. या मोहिमेत त्रिंबकरावांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. (डॉ. खोबेरकर वि.गो. महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड, भाग–२ ,पृष्ठ 217) स्वतंत्रपणे सैन्याचे नेतृत्व करण्याची संधी या मोहिमेमुळे प्राप्त झाली.

## पेशवे माधवराव व कारभारी म्हणून त्रिंबकराव पेठे यांची भूमिका

त्रिंबकराव पेठे यांना कारभारी पदावर नियुक्ती करण्यात गोपिकाबाई यांची भूमिका महत्त्वाची आहे. 20 जुलै 1761 रोजी माधवरावास पेशवाईची वस्त्रे मिळाली व त्याबरोबर सखारामबापूस कारभाराची वस्त्रे दिली. निजामाने ज्यावेळेस पुण्यावर चाल केली होती त्यावेळेस सखारामबापू व राघोबादादांनी निजामाशी जानेवारी 1762 मध्ये तह केला. निजामाला नष्ट करण्याची संधी चालून आली असताना राघोबादादाने तह करून त्याला सोडून दिले. त्यामुळे पुणे दरबारातील सर्व मंडळींना या कृत्याचा संताप आला. पुढे राघोबादादा व माधवराव असे दोन पक्ष निर्माण झाले. दरबारातील तेढ वाढत गेल्यानंतर सखारामबापूनी पुणे राज्यकारभारातून अंग काढून घेतले. या सर्व घटनेची माहिती पेशवे माधवरावांनी त्यांच्या नाशिक येथे असलेल्या त्यांच्या मातोश्री गोपिकाबाई यांना पत्राद्वारे कळविले.रघुनाथरावाच्या कटकारस्थालाना गोपिकाबाई ओळखून होत्या. त्यामुळे माधवरावांचा चांगला जम बसावा

असे त्यांना वाटत होते. म्हणून गोपिकाबाईच्या सूचनेवरून माधवरावाने त्रिंबकराव पेठे यांची कारभारी पदावर नेमणूक केली. (सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड 5,पृष्ठ क्र.37)

## जव्हार संस्थान दत्तक प्रकरण व त्रिंबकराव पेठे यांची भूमिका.

माधवराव व रघुनाथराव यांच्यातील मतभेद चालू असतानाच जव्हार संस्थानातील प्रकरण उद्‌भवले. राजश्री पतंगशहाराजे संस्थान जव्हार यांनी आपले राज्य भांडणात गमावले होते. उरलेले राज्य त्यांचा पुत्र विक्रम पतंगशहा मृत्यू पावल्यावर लयास गेले. त्यांना मुलगा नव्हता त्यामुळे वडील मातोश्री रायकुवरबाईने पेशवे बाळाजी बाजीराव यांचे त्यांच्या मृत्यूपूर्वी संमती घेऊन कृष्णशहाला दत्तक घेतले व पेशव्यांच्या विनंतीवरून राज्यावर बसवले. जव्हारसंस्थानावार मराठ्यांची चौथ होती. परंतु दत्तक कृष्णशहाणे ती दिली नाही उलट त्याने बदनामीची वर्तणूक केली. त्यावेळी पेशवे माधवराव यांनी जव्हार संस्थान जप्त करून कृष्णशहाला राज्य पदावरून बरखास्त केले. त्यावेळी मातोश्री मोइंकुवर यांनी माधवराव पेशव्यांना विनंती केली की, ‘‘पोटी संतान नाही, राज्य बुडते आहे, तेव्हा आम्हाला आमच्या वंशाचा धर्मपुत्र घेऊन राज्यात बसवायची परवानगी द्यावी. आमचे राज्य वाचवावे’’ यावेळी पेशव्यांनी त्रिंबकरावांना हया प्रकरणाकडे लक्ष घालण्याची आज्ञा केली. त्रिंबकरावांनी स्वतः लक्ष घालून दत्तक घेण्यास मातोश्री मोईन कुवरला मदत केली. जव्हार संस्थान पेशव्याने जप्त केले होते ते त्रिंबकरावांनी मोकळे केले. नवीन राज्य उभे केले. त्यावर दत्तक पुत्रास बसवले. राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. या जव्हार संस्थानचे राजे पतंगशहा द्वितीय यांनी त्रिंबकराव यांनी केलेल्या कार्याची उतराई म्हणून त्यांना मौजे देवरगाव वाघेरा हे गाव 6 ऑक्टोबर 1762 रोजी त्रिंबकरावांना इनाम करून दिला व तेथील सर्व हक्क, महसूल, मुलकी त्रिंबकरावांना दान केले. जव्हार संस्थानचे प्रकरण अतिशय चांगल्या प्रकारे हाताळून त्रिंबकरावांनी आपल्या कर्तृत्वाची ओळख करून दिली. (चितळे वी., सी, पेठे दप्तर, भाग 1, लेखांक 20, पृष्ठ 22)

आळेगावच्या विजयानंतर राघोबादादा पेशवेपदावर असल्यासारखे वागू लागले. त्यांनी माधवराव पेशव्यांच्या पक्षातील अनेकांचे सरंजाम जप्त केले. त्रिंबकराव पेठेसारख्या निष्ठावान सरदाराला कारभारा पासून बाजूला केले. त्रिंबकराव पेठे कारभारी पदावरून मुक्त झाल्यानंतर अज्ञातवासात असले तरी मराठा सरदारांशी संबंध ठेवून होते. त्यांच्याशी सल्लामसलत करीत होते. पानिपतच्या लढाईनंतर उत्तरेत मराठी सत्तेची राजकीय पोकळी निर्माण झाली होती. मराठ्यांचे उत्तरेत वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी आणि पानिपतचा पराभव व गेलेली प्रतिष्ठा परत मिळवण्यासाठी माधवराव पेशवे यांनी रघुनाथरावाला चाळीस हजार सैन्य देऊन उत्तरेत पाठवले. त्यांच्याबरोबर विश्वासू प्रतिनिधी म्हणून जानोजी भोसले त्रिंबकराव पेठे यांना पाठवले. (खरे ग.ह . संपा. हिंगणे दप्तर, खंड 2, लेखांक 43 पृष्ठ 39) 30 मार्च 1766 रोजी रघुनाथरावानी दरबार भरला असता त्रिंबकरावांना आपल्या डाव्या बाजूला बसवून मानाचे स्थान दिले. मामांनीहि मनात काही आकस न ठेवता रघुनाथरावांना योग्य सल्ला व सहकार्य दिले. या मोहिमेत त्रिंबकरावाची प्रकृती चांगली नसतानाही त्यांनी रघुनाथरावांना साथ दिली व त्यांच्या आज्ञेचे पालन केले. (पेशवे दप्तर, खंड 21, लेखांक 161) रघुनाथरावांनी झाशी, काल्पी, छत्तरपुर या भागातील करवसुलीची कामगिरी त्रिंबकराव पेठेकडे सोपवली होती. त्रिंबकराव पेठे यांच्या विश्वासुपणामुळे त्यांची जी इनामे जप्त केली होती ती इनामे रघुनाथरावाने पुन्हा त्यांना परत केली. त्रिंबकराव रघुनाथरावा जवळ असतानाही पेशव्यांशी सतत संपर्क ठेवताना आढळतात. पेशव्यापासून दूर असूनही पेशवा प्रती असलेला आदर व निष्ठा त्रिंबकरावा मध्ये दिसते. त्रिंबकरावांना उत्तर मोहिमे निमित्त कर्ज झाले होते. त्या कर्जातून मुक्त होण्यासाठी पेशव्यांनी त्रिंबकराव यांना 25 हजार रुपये बक्षीस दिले व कारभारी म्हणून पुन्हा त्यांची नेमणूक केली. (पेशवे दप्तर, खंड 22, लेखांक 209). यावरून माधवराव पेशवे यांना त्रिंबकराव पेठेबद्दल निष्ठा व कर्तृत्वाबद्दल पूर्णपणे विश्वास होता हेच दिसून येते.

## कर्नाटक स्वारीची जबाबदारी त्र्यंबकराव पेठेकडे सन 1770—72

सन 1761 च्या पानिपत वरील मराठ्यांच्या पराभवामुळे मराठा राजकीय सत्तेवर जबरदस्त आघात बसला व राज्यास उतरती कळा लागली. याचा फायदा अनेक शत्रूंनी घेतला. त्यापैकीच कर्नाटकातील हैदरअली एक होता. हैदरअलीच्या आक्रमक हालचालीला पायबंद घालण्यासाठी माधवरावाने कर्नाटकवर सन 1762 ते 1772 या कालावधीत पाच स्वा—या केल्या. पाचव्या स्वारीच्या वेळी 1770—72 या कालावधीत माधवराव पेशवे यांचे प्रकृती खालावल्यामुळे माधवराव पेशवे यांना परत यावे लागले. परत फिरताना माधवराव पेशव्यांनी त्रिंबकराव पेठे यांना

स्वारीचे प्रमुखपद देऊन सर्वांनी त्यांचे आज्ञेत राहून मोहीम यशस्वी करण्याची सूचना केली होती. त्यात महिपतराव कवडे यांचाही फौजफाटा होता. घोरपडे, पटवर्धन, रास्ते, गायकवाड, आनंदराव गोपाळ या सर्व सरदारांना त्र्यंबकमामांच्या अधिपत्याखाली काम करण्याच्या आज्ञा पेशव्यांनी दिल्या होत्या. (ऐतिहासिक लेख संग्रह, खंड–3, वा.वा. खरे, पृष्ठ 1405) या काळात मराठ्यांनी गेलेली सर्व ठाणी जिंकून घेतली. मात्र खुल्या मैदानावर मराठ्यांशी लढणे हैदरने टाळले. पावसाळयाच्या काळात त्रिंबकरावांनी हैदरचा मोठ्या शिकस्तीने बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. पेठे व पटवर्धन यांनी हैदरशी संघर्ष चालू ठेवला. 5 मार्च 1772 रोजी मराठा फौजेने श्रीरंगपट्टणम जवळील मोती तलावाच्या लढाईत त्रिंबकराव पेठे यांनी मोठा पराक्रम करून हैदरअलीचा पराभव केला. मराठ्यांनी थेट हैदरच्या तोफखना दलावर चाल करून त्या बंद पाडल्या. त्यामुळे हैदरने तहाच्या, वाटाघाटी सुरू केल्या. त्रिंबकराव पेठे हैदरचा पूर्ण बिमोड झाल्याशिवाय माघार नाही या आवेशात होते. परंतु माधवराव पेशव्यांचा आजार बळावत चालल्याने व इतर सरदारांच्या सल्ल्याने त्रिंबकरावांनी हैदर विरोधातील मोहीम संपवली. शेवटी त्रिंबकराव पेठे व हैदरअली यांच्यात 21 जून 1772 कीकोरीचा तह झाला. (मराठी रियासत, गो.स. सरदेसाई, खंड–5, पृ.क्र. 112) हा तह म्हणजे पेशवाईतील एक महत्त्वपूर्ण पर्व आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा कर्नाटकातील प्रदेश पेशव्यांनी मिळविला. त्रिंबक रावांनी पेशव्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत विश्वासाला तडा जाऊ दिला नाही. कर्नाटक मोहिमेत सेनापतीच्या स्वरूपात शूरता, जिद्द, कुशलता व प्रगल्भता इत्यादी गुणांचा परिचय दिला. माधवराव पेशवे यांची प्रकृती खूपच ढासळलेली आहे हे समजताच ताबडतोब त्रिंबकराव थेउर येथे पेशव्यांच्या भेटीस गेल्यावर. त्रिंबकरावावर पेशवे यांनी एक विश्वासू व कर्तव्यदक्ष व्यक्ती म्हणून पुण्याची सर्व जबाबदारी सोपवली व ताबडतोब पुण्याच्या बंदोबस्त साठी पाठवून दिले. (चितळे वि.सी., संपा. पेठे दप्तर, भाग 2, पृष्ठ क्रमांक, 111)

## कासेगावची लढाई व त्रिंबकरावांचा मृत्यू

पानिपतच्या तिस–या लढाईतील पराभवाच्या धक्क्याने बाळाजी बाजीरावाचा मृत्यू झाला. त्यानंतर पेशवा बनलेल्या माधवरावाने असामान्य कर्तृत्व गाजवून मराठेशाहीला सावरले. त्यांच्या निधनानंतर नारायणरावास पेशवाईची वस्त्रे मिळाली. पण अवघ्या आठ महिन्याच्या कारकीर्दीतच त्यांचा खून झाला. या खुनास रघुनाथराव जबाबदार असल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे मराठा मंडळात निर्माण झालेली बारभाई फौज व रघुनाथराव पेशवे यांच्यात कट कारस्थाने सुरू झाली. या बारभाई मंडळात 12 मुत्सद्दी लोकांपैकी त्रिंबकराव पेठे हे एक होते. रघुनाथराव कर्नाटक मोहिमेवर असताना बारभाईच्या कारस्थानाची माहिती मिळताच तो हैदरअली बरोबर समजोता करून माघारी फिरला. सातारा किंवा पुरंदर वर चालून येईल याचा अंदाज घेऊन बारभाईंनी त्रिंबकराव पेठे व हरिपंत फडके यांच्याकडे साता–याच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवली. तसेच पटवर्धन व रास्ते यांना राघोबाच्या समाचारासाठी पाठवले. राघोबादादाने पुरंदर कडे येऊ नये म्हणून त्र्यंबकमामा, हरिपंत फडके, निजाम व साबाजी भोसले यांनी कलबुर्गी पासून सातारा पर्यंत फौजेची रांगच रांग बनवून ठेवली. (गो.स.सरदेसाई, मराठी रियासत खंड 5, पृ.क्र.316) राघोबादादा कुठे सापडतील तिथे पकडण्याचा बेत ठरवला. राघोबादादाचा साता–याला जाऊन छत्रपतींना ताब्यात घेण्याचा उद्देश सफल झाला नाही. शत्रुपक्षाच्या सैन्याला चुकवून मिरजेला न जाता दादाने पंढरपूरचा रस्ता धरला. ही बातमी त्रिंबकमामाला कळताच वेगवान हालचाली करत दादाच्या पाठीमागे कासेगाव पर्यंत पोहोचले. कोणत्याही परिस्थितीत राघोबादादाला पकडावे या हेतूने त्रिंबकराव पेठे यांची धावपळ चालली. राघोबादादाने त्रिंबकराव पेठे यांचेशी संधान साधून वाटाघाटीच्या कारस्थानात गुंतवून अचानक पाठीमागून हल्ला केला त्यात त्रिंबकराव पेठे जखमी झाले व आठव्या दिवशी त्यांचा मृत्यू झाला. (गो.स.सरदेसाई, मराठी रियासत खंड 5, पृ.क्र.363)

त्रिंबकराव पेठे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. त्यांच्या साठ वर्षाच्या जीवन प्रवासात पेशवे थोरले बाजीराव, बाळाजी बाजीराव, थोरले माधवराव आणि नारायणराव अशा चार पेशव्यांच्या कालखंडाचे साक्षीदार आहेत. या कालावधीत त्यांचा पेशव्यांचे जवळचे नातेवाईक म्हणून कौटुंबिक व राजकीय घडामोडीत सहभाग होता. माधवराव व रघुनाथराव यांच्या गृहकलहात त्रिंबकरावांनी सतत माधवरावाचा पक्ष घेतला होता. त्रिंबकराव पेठे यांना दिलेली कमाविसदार व मोकासदार या जबाबदा–याही त्यांनी निष्ठेने पार पाडल्या. खानदेशात महसूल वसुलीची उत्तम व्यवस्था लावल्यामुळे नियमित महसूल मिळण्याची सोय झाली होती. कर्नाटक मोहिमेमध्ये मुख्य सेनापती म्हणून नियुक्ती झाल्यानंतर ती जबाबदारी त्यांनी निष्ठेने पार पाडली. पेशवे माधवराव यांच्या काळात

त्रिंबकरावांचा कर्तृत्वपणा अधिक बहरला होता. 1762 मध्ये सखारामबापूने रघुनाथरावाचा पक्षपातीपणा करून कारभारी पद सोडले. तेव्हा गोपिकाबाईच्या मध्यस्थीने त्र्यंबकरावाची कारभारी म्हणून नियुक्ती झाली. त्र्यंबकरावाने अतिशय कार्यक्षमपण हे पद सांभाळणे व अनेक सरदारांना पेशव्यांप्रति निष्ठावान बनवले. मामांची कार्यशैली, समजूतदारपणा, निष्कपटपणा पेशव्यांच्या संरक्षणार्थ झटणे आणि कार्यकुशलता इत्यादी गुणांमुळे ते पेशव्यांचे जवळचे विश्वासू बनले. पेशवे माधवरावांच्या काळात त्र्यंबकरावांचा बहुतेक काळ माधवरावांचे राजकीय युद्धविषयक घडामोडीत गेला. परंतु पेशव्यांचे खाजगी धार्मिक कार्यातही त्यांचा सहभाग होता. ते कुटनीतीज्ञ असतील पण त्यांना राजनीतीची चांगली जाण व समज होती. त्यांच्या कृतींना स्वार्थाचा गंध नव्हता. राज्याचे कल्याण व प्रजेचे हित हे त्यांचे उद्दिष्ट होते. पेशव्यांच्या प्रती त्यांना आदर होता. त्रिंबकराव पेठेचा काटकपणा, संकटसमयी लागणारी चिकाटी, सोशिक वृत्ती, सर्वाशी मिळते घेण्याचा गुण यामुळे त्यांना सेनानायक म्हणून यश मिळाले. कर्तव्यदक्षता व शिस्तप्रिय योद्धा या गुणांमुळे त्यांना हैदर व रघुनाथराव सारख्या श्रेष्ठ सेनापती वर आपली छाप पाडता आली. त्यांचे सेनापती म्हणून मराठा इतिहासात न विसरणारे योगदान आहे.

## संदर्भ–


1) चितळे वि.सी. (संपा.), पेठे दप्तर, भाग–२
2) पेशवे दप्तर, खंड–21, 22, 30
3) पुरंदरे कृ.वा. (संपा.) पुरंदरे दप्तर, भाग–२
4) खरे वा.वा.ऐतिहासिक लेख संग्रह, खंड–3
5) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड 5, 6
6) डॉ.खोबरेकर वि.गो. महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड, भाग–2